Sunday, September 04, 2005 1:40:00 AM

संक्षिप्त




# डोळ्यावर पट्टी बांधून साकारली गणेशमूर्ती

**मुंबई :** एक गृहिणी, आई व सामाजिक क्षेत्रात वावरताना वेगळे व्यक्तिमत्त्व निर्माण करण्याची कामगिरी रमाबेन शाह यांनी करून दाखवली आहे. डोळ्यांवर पट्टी बांधून गणेशमूर्ती बनवण्याची कला रमाबेन यांनी आत्मसात केली आहे. गेल्या १३ वर्षांत रमाबेन शहा यांनी वेगवेगळ्या प्रकारच्या २ लाख ५३ हजार मूर्ती डोळ्यांवर पट्टी बांधून तयार केल्या आहेत. गुरुवारी रमाबेन यांनी प्रेसक्लब येथे या अद्‌भूत कलेचे सादरीकरण केले. विविध ठिकाणी त्यांना या सादरीकरणासाठी निमंत्रित केले जाते. डोळ्यावर पट्टी बांधून गणेशाची मूर्ती साकारताना पाहून उपस्थित अचंबित होतात. लोकांकडून मिळणारा प्रतिसाद माझ्यासाठी मोठा पुरस्कार असल्याचे रमाबेन सांगतात. रमाबेन यांना आजपर्यंत अनेक पुरस्कार मिळाले आहेत. ९९ दिवसात ९९९९ मूर्ती बनवण्याचा त्यांचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. १२ वेळा लिम्का बुक ऑफ रेकॉर्डमध्ये त्यांची नोंद झाली आहे.